# SUSTAINABLE DEVELOPMENT AND ENVIRONMENT PROTECTION

कला, वाणिज्य व विज्ञान
कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय

**Chief Editor**

**Dr. B. M. Dhoot**

**Co-Editor**

**Dr. S.B. Donge**

**Dr. S.U. Kalme**

**Mr. K.B. Giri**

**Dr. S.V. Kshirsagar**

# Sustainable Development and Environment Protection

**Chief Editor**
Dr. B. M. Dhoot

**Co-Editor**
Dr. S.B. Donge
Dr. S.U. Kalme
Mr. K.B. Giri
Dr. S.V. Kshirsagar

**ISBN No.** 978-93-83995-70-8

**Published by:**
Anuradha Publications
Cidco-Nanded

**Publication Year:** 2017-18

**Price-** Rs. 100/-

**Copyright © ACS College, Gangakhed**

**Printed by**
Gurukrupa Offset,
Near Police Station, Gangakhed

**Typesetting by:**
Simran Computers
Gangakhed Dist.Parbhani

**Cover Designby:**
Mr. Imran K. Mohammad

# CONTENTS

**Sr. No.** **Content**

01 Environmental Perception and Behaviour

02 भारतातील कृषी क्षेत्रातील ऊर्जा वापराचा चिकित्सक अभ्यास

03 गंगाखेड तालुक्यातील हवामान बदलाचा ज्वारी उत्पादनावर झालेला परिणाम:एक भौगोलिक अभ्यास

04 कृषी विकासासाठी जलव्यवस्थापन करणे: एक भौगोलिक चिकित्सा

05 जागतिक तापमान वाढीस कारणीभूत घटक

06 पर्यावरण नीतिशास्त्राचा अभ्यास : सद्दकालीन गरज

07 Water Pollution and Water Treatment Techniques

08 Impact of Covid-19 on Agriculturure Sector

09 Hazardous effect on environment & living things due to transmission of electricity

10 Role of Technology in Agriculture and Rural Development

12 सुक्ष्मजिवाच्या विश्वात

13 नैसर्गिक साधनसंपदा संवर्धन व विकास: ऐक भौगोलिक चिकित्सा

14 मैं पेड़ बोल रहा हूं

15 Problems and Prospects of Agro-Based Industries in India

16 दुष्काळ एक पर्यावरणीय आपत्ती: एक चिकित्सा

17 पर्यावरण आणि विकास: एक भौगोलिक चिकित्सा

18 निसर्गाची अद्‌भुत निर्मिती - जांभूळ बेट

19 भारतातील प्रमुख खाद्यान्न उत्पादनाचा कालसापेक्ष अभ्यास

# पर्यावरण नीतिशास्त्राचा अभ्यास : सद्दकालीन गरज

प्रा. डॉ. सचिन खोकले
श्री संत जनाबाई महाविद्यालय,
गंगाखेड जि. परभणी

आज मानव जातीसमोर एक भीषण पर्यावरणीय संकट उभे टाकले आहे. ते पर्यावरणाचे प्रदूषण आणि ऱ्हास इतकेच मर्यादित नाही. तर संपूर्ण मानवजातच पृथ्वीवरून नामशेष होते की काय या स्वरूपाचे आहे. पर्यावरणात होणारे बदल हे जीवनपद्धती टिकवून धरणाऱ्या निसर्गाच्या प्रणालीलाच उध्वस्त करू शकतात. म्हणून पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे स्वतःचेच रक्षण करणे होय.

नीतिशास्त्र ही तत्त्वज्ञानाची एक शाखा आहे. नीतीला इंग्रजीत Ethics किंवा Moral Philosophy असे म्हणतात. Ethics शब्द हा प्राचीन ग्रीक भाषेतीली ethos या शब्दापासून बनतो. Ethos म्हणजे सामाजिक चालीरीती, रूढी, परंपरा, समाजमान्य वर्तन. तोच Moras या लॅटिन शब्दाचा अर्थ आहे. त्यामुळे माणसाच्या समान वागण्याच्या नियमांना moral म्हटले जाते. संस्कृत किंवा मराठीतील नीती म्हणजे नेणे, घेऊन जाणे. एका विशिष्ट मार्गाने घेऊन जाणारी नियमावली, असा होतो. नैतिक संकल्पनांचे विश्लेषण करणाऱ्या शास्त्राला नीतिशास्त्र असे म्हणतात.

पर्यावरण नीतिशास्त्र ही नीतीविषयक विचारांची कक्षा केवळ मानवापुरती न ठेवता, मानवासह मानवेतर सजीवांनाही सामावून घेईल अशी व इतकी व्यापक करावी, असा धोरणात्मक नैतिकतेचा आग्रह धरणारी उपयोजित नीतिशास्त्राची शाखा आहे. पर्यावरणविषयक कायदे, पर्यावरण धर्मशास्त्र, पर्यावरण अर्थशास्त्र, पर्यावरण भूगोल व पर्यावरण विज्ञान अशा अनेक सामाजिक व नसािगक विज्ञानांचा चिंतनविषय असणारे हे आंतरविद्याशाखीय नीतिशास्त्र आहे. सन १९१५ मध्ये डॉ. अल्बर्ट श्वायत्झर या जर्मन तत्त्ववेत्त्याने मांडलेला 'जीवनविषयक पूज्यभाव' (The Reverence for Life) हा विचार जगातील पहिला पर्यावरणनीतीचा विचार मानला जातो. जीवन या संकल्पनेत श्वायत्झर यांनी पृथ्वी आणि सर्व सजीव सृष्टीचा समावेश केला. त्यानंतर पॉल टेलर या अमेरिकन विचारवंताचा 'निसर्गाविषयीचा आदर' सिद्धांत, आल्डो लिओपोल्ड या पर्यावरण तत्त्ववेत्त्याच्या दि सॅण्ड कौंटी अल्मॅनक (१९४९) या पुस्तकातील भूमी नीती (Land Ethics) सिद्धांत

आणि राशेल कार्सन यांच्या Silent Spring (१९६२) या पुस्तकांनी या विषयाला सुरुवात झाली. विशेषत: राशेल कार्सनने डी.डी.टी. व इतर रासायनिक औषधांमुळे पिके विषारी बनणे, मानव व मानवेतर प्राणी नष्ट होण्याचा सिद्धांत मांडल्यानंतर जग खडबडुन जागे झाले. १९७० च्या पहिल्या जागतिक वसुंधरा दिन परिषदेनंतर पर्यावरणाचे नीतिशास्त्र या नावाने ही नवी विद्याशाखा अस्तित्वात आली.

पर्यावरण नीतिशास्त्र मुख्यत: पाच समस्यांचा अभ्यास करते. (१) विविध प्रकारचे प्रदूषण (२) नसर्गिक साधनसंपत्तीचा दुरुपयोग (३) वाढती लोकसंख्या (४) प्राण्यांविषयी माणसाची अभिवृत्ती आणि माणूस त्यांना देत असलेली वागणूक (५) विविध प्रकारच्या पर्यावरण प्रणालींचे स्वयंसिद्ध मूल्य. पर्यावरण नीतिशास्त्र या विद्याशाखेत ईश्वरकेंद्रवाद, मानवकेंद्रवाद, जैवकेंद्रवाद आणि पर्यावरणकेंद्रवाद हे निव्वळ ॲकेडेमिक सिद्धांत आणि प्राण्यांचे हक्क, शाकाहारवाद, प्राण्यांवरील प्रयोगांबाबत नैतिक धोरणे तसेच शाश्वत विकास ही संकल्पना हे चळवळीतून निष्पन्न होणारे मुद्दे अभ्यासले जातात. अर्थात विविध देशांतील विद्यापीठांच्या व सरकारच्या धोरणांनुसार काही बदल होतात, पण साधारणत: हे समान मुद्दे असतात. 'स्त्रीवादी पर्यावरणवाद' हा या नीतिशास्त्राच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा आहे. फ्रान्को डी युबोनी (१९१२-२००५) या फ्रेंच स्त्रीवादी लेखिकेने उपयोगात आणलेल्या फ्रेंच संज्ञेचे ecofeminism हे इंग्लिश भाषांतर.

स्त्रीचे अवमूल्यन व पृथ्वीचे अवमूल्यन यांतील साम्य अधोरेखित करून त्या साम्यावर व पुरुषप्रधानतेवर युबोनीने प्रहार केला. विसाव्या शतकात या सर्व मांडणींना लोउक फोन वेनस्वीन या नेदरलँड्स येथील संशोधिका आणि पर्यावरण नीतिशास्त्रज्ञ यांनी अत्यंत वेगळी कलाटणी दिली आहे. तिने पर्यावरण सद्‌गुण नीतिशास्त्र (Environmental virtue ethics) ही नवी मांडणी पुढे आणली. ती अमेरिकेतील काही विद्यापीठे व शिक्षण संस्थांप्रमाणेच उद्योग समूहांत शिकविली जात आहे. परिणामी पर्यावरण नीतिशास्त्राकडे, चळवळींकडे पाहण्याचा अभ्यासकांचा व पाश्चात्त्य राष्ट्रांतील सरकार वा धोरणकर्ते यांचा दृष्टिकोन बदलला, तो अधिक पूरक आणि जास्तीत जास्त वास्तव बनला. वेनस्वीनच्या मते, आजपर्यंतच्या पर्यावरण-विषयक सैद्धान्तिक मांडणीमध्ये तत्त्ववेत्ते, विचारवंत, कार्यकर्ते, बिगरसरकारी संस्था इत्यादी संबंधित मंडळींनी जी भाषा वापरली त्या भाषेचे आज नव्याने विश्लेषण करणे आवश्यक आहे. तिच्या मांडणीनुसार पर्यावरण नीतिशास्त्रज्ञ, कार्यकर्ते,

बिगरसरकारी संस्था इत्यादी संबंधित मंडळींना पारंपरिक सद्‌गुणांची मूल्यजड भाषा वापरण्याची सवय असते आणि हजारो वर्षे तीच ती भाषा वापरली गेल्याने लोकांवर तिचा काहीही परिणाम होत नाही, ती भाषा अतिशय उथळ, गुळमट, निष्प्रभावी बनते.

उलट ते नैतिक संकल्पनांची चेष्टा करतात, म्हणजे नैतिकतेची चेष्टा करतात. गांभीर्याने घेत नाहीत. त्यासाठी ही नीतीच्या परिभाषेची पुनर्रचना करता येईल आणि ही नैतिकता प्रत्यक्ष सार्वजनिक धोरणप्रक्रियेत आणि दैनंदिन जीवनात कशी अमलात येईल, हा प्रकल्प राबवला पाहिजे. याबाबतचे वेनस्वीनने लिहिलेले क्रांतिकारक पुस्तक म्हणजे 'डर्टी व्हर्च्यूज : द इमर्जन्स ऑफ इकॉलॉजिकल व्हर्च्यू एथिक्स' (१९९७). यातील 'डर्टी व्हर्च्यूज' म्हणजे 'अस्वच्छ/ घाणेरडे सद्‌गुण' असे नसून 'डर्ट' म्हणजे माती, पर्यायाने पृथ्वी. म्हणून 'डर्टी व्हर्च्यूज' म्हणजे पृथ्वीविषयक सद्‌गुणशास्त्र. पर्यावरणविषयक साहित्याचे व्यापक सर्वेक्षण करून वेनस्वीनने विद्यमान पर्यावरण सद्‌गुणवादी सिद्धांताला जुळणाऱ्या मूळतत्त्वांचा समावेश करणारी नवी 'हरित सद्‌गुण भाषा' रचण्याचा आधुनिक प्रस्ताव दिला आहे. या पुस्तकात तिने अशा १८९ सद्‌गुणांची आणि १७४ दुर्गुणांची यादीच जोडली आहे. आजपर्यंत मांडलेल्या हजारो सद्‌गुणवादी संकल्पनांच्या जंजाळामधून नेमकी परिभाषा आजच्या पर्यावरण युगात वापरणे, याचा अर्थ आपली भूमिका नेमकी, नेटकी करणे, असे ती मांडते.

## समारोप

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात मानवजातीसमोर अनेक प्रकारच्या जटील समस्या निर्माण झाल्या. त्या समस्यांना सामोरे जाताना पारंपरिक नितिशास्त्रास मर्यादा येताना दिसू लागल्या. त्या गरजेतून उपयोजि नीतिशास्त्र ही शाखा निर्माण झाली. पर्यावरण नीतिशास्त्र ही उपयोजित नीतिशास्त्राची एक शाखा असून यात मानव व पर्यावरण संबंधाचा विविध दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो. हा अभ्यास सध्याच्या परस्थितीत फार महत्वाचा आहे.

संदर्भ :

1) श्री.ह.दीक्षित, अथातो नितीजीज्ञासा, म.त.म.मंडळ पुणे, १९८२
2) शि.स.अंतरकर, नितीविमर्ष, परामर्श, खंड २४ अंक ०१
3) https://www.loksatta.com/sampadkiya-news/moral-philosophy-660431/

*****